# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१६/२०२२** **दिनांक १७/१२/२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी.** **वेळ- दुपारी ०१.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दि.१७/१२/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३६४६/२०२२, दि.१५.१२.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दि.१७/१२/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६५९ वेळे अभावी तहकुब.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ दि.०५.१२.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६६० दि.०५.१२.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग )**

---

**विषय नं.३ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. सन २०२२-२३ (डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३) अखेर गाईचे शुध्द तुप अल्प मुदतीची ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.६६१/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**२. सन २०२२-२३ वर्षाकरीता प्रसादालय, कॅन्टीन, मंदिर व लाडू निर्मिती विभागांसाठी आवश्यक किराणामाल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६६१/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**३. संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलसाठी आवश्यक असणारे औषधे व तद्रुशंगीक साहित्य खरेदीबाबतच्या ई-निविदेच्या मसुद्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६१/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४** **सन २०२३-२४ करीता अकुशल, कुशल व कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रक्टरची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६२** **संबधीत विभागप्रमुख यांनी पाहिजे असलेल्या कर्मचा-यांची संख्या व कार्यरत कर्मचा-यांची संख्या प्रत्यक्ष तपासून प्रत्येक विभागासाठी कर्मचा-यांच्या वेगवेगळया संख्या दाखवून प्रस्ताव पुन्हा सादर करावा.**

**कुशल व अकुशल श्रेणीमध्ये पाहिजे असलेल्या कर्मचा-यांच्या शैक्षणिक व इतर पात्रतेचा उल्लेख ई-निविदेमध्ये करावा. तसेच ज्या-ज्या पदाला शासनाचे नियमाप्रमाणे किंवा समितीचे निर्णयाप्रमाणे काही शैक्षणिक किंवा इतर पात्रता विहीत असल्यास त्याचा उल्लेख ई-निविदेमध्ये करावा.**

**सध्या ३१ जानेवारीला सध्याचा करार संपत असल्यामुळे आहे त्याच दराने व अटी शर्तीनुसार दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ देण्यात येत आहे. दरम्यान प्रस्तुत प्रकरणी मुदतीत ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी वरील प्रमाणे माहितीसह सविस्तर प्रस्ताव लवकरात लवकर समितीपुढे ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.५** **सन २०२३-२४ करीता कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टरची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६३** **एम.एस.एफ. सुरक्षा कर्मचा-यांना नेमणेबाबत मा.उच्च न्यायालयाने दि.१३.१२.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुर्तता करावी.**

**संबधीत विभागप्रमुख यांनी पाहिजे असलेल्या कर्मचा-यांची संख्या व कार्यरत कर्मचा-यांची संख्या प्रत्यक्ष तपासून प्रत्येक विभागासाठी कर्मचा-यांच्या वेगवेगळया संख्या दाखवून प्रस्ताव पुन्हा सादर करावा.**

**पाहिजे असलेल्या कर्मचा-यांच्या शैक्षणिक व इतर पात्रतेचा उल्लेख ई-निविदेमध्ये करावा. तसेच ज्या-ज्या पदाला शासनाचे नियमाप्रमाणे किंवा समितीचे निर्णयाप्रमाणे काही शैक्षणिक किंवा इतर पात्रता विहीत असल्यास त्याचा उल्लेख ई-निविदेमध्ये करावा.**

**सध्या ३१ जानेवारीला सध्याचा करार संपत असल्यामुळे आहे त्याच दराने व अटी शर्तीनुसार दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ देण्यात येत आहे. दरम्यान प्रस्तुत प्रकरणी मुदतीत ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी वरील प्रमाणे माहितीसह सविस्तर प्रस्ताव लवकरात लवकर समितीपुढे ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.६** **साठा संपुष्टात येत असलेल्या संस्थान प्रकाशित २१ प्रकाशने (पुस्तके) पुर्न:मुद्रण/ छपाई करुन पुरवठा करणेकामी नव्याने ई-निविदा मागणी करणेबाबत.**

**निर्णय क्र.६६४** **रक्कम रु.३,११,५५,०००/- खर्च करुन प्रस्तावातील तक्ता क्र.२ मध्ये नमुद संख्येमध्ये पुस्तके छपाई करुन घेण्याचा प्रस्ताव वाणिज्यीक ई-निविदा घडल्यानंतर निम्नतम निविदाधारकाने दिलेला दर ३४ टक्क्याने जास्त असल्यामुळे पुस्तकांची संख्या कमी करुन तक्ता क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कमी संख्येत पुस्तके छपाई करणेसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी परवानगी मागीतली आहे. बेस प्राईस फिक्स करतांना १० टक्के वाढीव किंमत विचारात घेतल्यामुळे सदर ३३.९४ टक्के वाढीव निविदा प्राप्त झाली आहे.**

**काही पुस्तके २००९ साली प्रकाशीत असल्यामुळे त्यावर १० टक्के वाढीव दर निश्चीत करणे देखील प्रचलित दरवाढीनुसार उचित नाही. आपला उद्देश बजेटमधील मंजूर झालेल्या रकमेत पुस्तके प्रकाशित करुन घेणे तसेच पाहिजे असलेल्या संख्येत प्रकाशित करुन घेणे देखील आहे.**

**विभाग प्रमुख यांनी या खरेदी प्रक्रियेत पुर्वीचे मुद्रकाकडून आणि बाजारात तशी सेवा पुरविणारे इतर पुरवठाधारक यांचेकडून माहिति घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत फेर प्रस्ताव सादर करावा. योग्य वाटल्यास स्विस चॅलेंज पध्दतीचा वापर करता येईल का याचा देखील विचार करावा.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.७** **श्री साईचरित्र हिंदी व प्रादेशिक भाषेतील श्री साईचरित्र देणगी स्वरुपात स्विकार करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६५** **सदर मुद्रकाकडून आवश्यक करारनाम्याचा मसूदा बोलवून घ्यावा जे-णे करुन संस्थानने दिलेल्या साहित्याचा वापर करुन पुस्तक छापून बाहेरच्या व्यक्तींना सदर मुद्रक देणगीदार पुरवठा किंवा विक्री करणार नाही.**

**सदर देणगीदार वरील विषय क्र.६ मधील २१ प्रकाशनांपैकी राहिलेली प्रकाशने देखील छपाई करुन देऊ इच्छित आहे काय याची माहिती घ्यावी.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.८** **श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील जनरेटर रुमचे मागील पडलेल्या व पश्चिमेकडील कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी येणा-या रक्कम रु.१३,३८,३९५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६६** **तहकुब.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.९** श्री साई प्रसादालय परिसरात खराब झालेले पेव्हिंग ब्लॉक काढून नविन पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दक्षिण बाजूने बागेमधून साईभक्तांना बाहेर पडण्यासाठी फुटपाथ तयार करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराची निविदा मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर होणेबाबत.

**निर्णय क्र.६६७** तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.१०** पुर्वीचे ठेक्याची मुदत माहे मार्च-२०२३ मध्ये संपुष्टात येत असल्याने सन २०२३-२४ करीता पुर्व तयारी करणेचे दृष्टीने मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकिंग करुन देणेकामी उक्त्या मजुरी दराची अंदाजे रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६६८** तहकुब. (कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.११** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२२ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६२,३२,३५५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६६९** मुख्य लेखाधिकारी यांचेकडून लेखापरिक्षण करुन घ्यावे. लेखापरिक्षण अहवालासह समितीसमोर सदरचा विषय सादर करावा. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.१२** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्त्पेढीमध्ये ऑगस्ट-२०२२ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५८,३६,०१४/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६७०** मुख्य लेखाधिकारी यांचेकडून लेखापरिक्षण करुन घ्यावे. लेखापरिक्षण अहवालासह समितीसमोर सदरचा विषय सादर करावा. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.१३** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर-२०२२ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५४,६४,५५९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६७१** मुख्य लेखाधिकारी यांचेकडून लेखापरिक्षण करुन घ्यावे. लेखापरिक्षण अहवालासह समितीसमोर सदरचा विषय सादर करावा. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.१४** **डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, अहमदनगर व प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी यांना श्री साईबाबा मंदिर परिसरात रक्तदान संकलन शिबीर घेणेकरीता परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६७२** **जिल्हा रुग्णालय,अहमदनगर यांचेकडून दि.१७/१२/२०२२ चे पत्र जे तदर्थ समितीचे अध्यक्ष यांना प्राप्त झाले, त्याचा उल्लेख अध्यक्ष यांनी या सभेमध्ये केला. या व्यतिरिक्त तीन अर्ज प्राप्त झालेले असल्याबाबत प्रशासनाने माहिती दिली.**

**संस्थानचे रुग्णालयांची आवश्यकता/गरज विचारात घेवून रक्तसंकलन शिबीर घेणेकामी परवानगी मिळणेबाबत आलेल्या सर्व अर्जांसह हा अर्ज घेवून या विषयावर सर्वंकष अभ्यासपुर्वक फेर प्रस्ताव स्पष्टपणे सादर करण्यात यावा.**

**अशी माहिती मिळाली की, पूर्वी रक्तदान शिबीर लेंडीबाग येथे बुकस्टॉलचे जागेत आयोजित केले जात होते. कोव्हीड लॉकडाऊन उठविल्यानंतर सदरचे शिबीर गेट नं.२ जवळ भरत असल्यामुळे त्यास प्रतिसाद अत्यल्प आहे. म्हणून पुर्वीचे ठिकाणी रक्तसंकलन शिबीर घेण्यात यावे व याकामी काही अडचण असल्यास समितीला तसे अवगत करावे.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.१५** **संस्थानचे नावे, बोधचिन्हे, अधिकृत वेबसाईट, प्रकाशने इ.चे Trademark व Copy Right बाबतची कार्यवाही करणेकामी या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागारांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.६७३** **संस्थानचे नावे, बोधचिन्हे, अधिकृत वेबसाईट, प्रकाशने इ. चे Trademark व Copy Right बाबतची कार्यवाही करणेकामी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घेवून समितीपुढे सविस्तर विषय सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१६** **सर्व न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने बाजू मांडणेकरीता वरिष्ठ वकिलांचे पॅनल तयार करणेसाठी पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६७४** **सद्या पॅनलवर जे वकील आहेत त्यांना दिलेले काम व त्यांनी दिलेली सेवा याचे माहितीसह प्रस्ताव समितीसमोर ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.१७** **संस्थानला माहे डिसेंबर-२०२१ ते जून-२०२२ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.६७५** **या विषयातील तज्ञाकडून मत मागवून त्यांचेकडून विषयाचे सादरीकरण करुन घ्यावे व त्यानंतर निर्णय घेतला जाईल. यापुढे तपासणी अहवाल त्या वस्तुच्या वापरापूर्वी प्राप्त होईल असा प्रयत्न करावा.**

**बी.आय.एस.कडून मत मागविण्यात यावे. बी.आय.एस.चे प्रतिनिधी, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची उप समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियमातील कलम 17(2)(J) प्रमाणे गठीत करण्यात येत आहे. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कमिटीची बैठक घेऊन अहवाल आणि सादरीकरण समितीपुढे सादर करावे.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.१८** **श्री साईभक्तांना स्नानासाठी पुरेसे गरम पाणी उपलब्ध होणेकामी सोलर हॉट वॉटर सिस्टीम करीता नविन हॉट वॉटर टॅक खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६७६** **प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर टाक्या तपासून निकामी असल्याबद्दल खातरजमा करुन तपासणीचा अहवाल पुढील बैठकी सादर करण्यात यावा. प्रस्ताव मंजूर. पुढील कार्यवाही करावी.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१९** **श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजन बनविणेकामी आवश्यक आटा तयार करणेकामी नविन आटा युनिट खरेदी करणेकरीता ई-निविदेतील मे.हिदुस्थान ॲग्रो इंजिनिअरींग, वेरावल, गुजरात यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे फेर सादर.**

**निर्णय क्र.६७७** **अभ्यास करणे आहे. तहकुब.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२०** **श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने रेफ्रिजरेटर्स बायबॅक देऊन नवीन खरेदी करणेकामी ई-निविदेतील मे.गोदरेज ॲन्ड बॉयस एमएफजी कंपनी लि., पुणे यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सादर.**

**निर्णय क्र.६७८** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा संस्थानच्या सर्व इमारती व परिसरात बसविलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधी करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सादर.**

**निर्णय क्र.६७९** **तहकुब.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२२** **वाढीव शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजना तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी देणेचे शुल्क रक्कम रुपये ६०.०० लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास आदा करणेस तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यात टप्पा क्र.१ कामाचा करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६८०** **या विषयाची सद्यस्थिती काय आहे आणि इतर स्पष्टीकरणाकरीता सबंधीतांकडून विषयाचे सादरीकरण करणेसाठी त्यांना समिती समोर बोलविण्यात यावे.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्रींचे समाधी मंदिर व परिसरात अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेकरीता सल्लागार नेमणूक करणेबाबतचे कार्यवाहीबाबत.**

**निर्णय क्र.६८१** **अट ‘क’ प्रमाणे चारपैकी एकही निविदाधारक पात्र नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया रद्द.**

**जिल्हा नियोजन अधिकारी यांचेशी स्पिकर ऑन मोडवर समिती सदस्यांनी बोलून माहिती घेतली. पोलीस विभागाचे शिर्डी नगरपरिषद शहर व अहमदनगर शहरात सीसीटीव्ही व्यवस्थेचे सल्लागार नियुक्त करणार आहेत, त्याच कंन्सलटंन्सीमध्ये शिर्डी साईबाबा संस्थानचे परिसराचा समावेश करुन सल्लागाराची सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी ते तयार आहेत त्या प्रमाणे पत्र पाठवून पाठपुरावा करावा व पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२४** **सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने खराब झालेल्या रिकामे तेलातुपाचे लहान/मोठे तोंडाचे खराब व चांगले डबे विक्री करणेकामी फेर ई-निविदा मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.६८२** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.२५ आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये व्यवस्थापन निधीत रक्कम रु.३५,००,३३,३४७/- वर्ग करण्यास व त्यास शासनाची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.६८३ तहकुब.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेले सोने चांदीच्या वस्तु वितळून उपलब्ध होणारे शुध्द सोने-चांदीपासून श्री साई प्रतिमेची नाणी/पेन्डंड बनविण्यास येणा-या खर्चासंबधीत माहिती शासनास कळविणेबाबत.**

**निर्णय क्र.६८४ प्रस्ताव मंजूर. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाकडून परवानगी घ्यावी. मा.न्यायालयाचे परवानगीनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम १७ (४) नुसार शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव २०१७ साली पाठविण्यात आलेला होता. शासनाने विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि/१०१७/३४६/प्र.क्र.४३/का.१६, दि.२८ जुलै,२०१७ अन्वये सोने चांदीच्या वस्तू वितळवून प्राप्त धातूपासून श्री साई प्रतिमेची नाणी बनविण्यास मान्यता दिलेली आहे.**

**पुर्वीपासून प्रलंबीत असलेला स्ट्रॉंगरुमचा प्रस्ताव सुरक्षेसंबधी सर्व विभागाचे अभिप्रायासह प्रस्ताव समितीपुढे ठेवण्यात यावा. याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम २० (३) नुसार शासनाकडे प्रस्ताव पाठविणे गरजेचे आहे.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२७ आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.६८५ अर्ज नस्तीबध्द करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२८ दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ चे आकृतीबंधासोबतच्या मंजूर परिशिष्ट “अ” मध्ये नमुद असलेल्या वेतनश्रेणीनुसार संस्थान आस्थापनेवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घेणेत आलेले कंत्राटी कर्मचारी यांचा वेतन मिळणेबाबतचा अर्ज निर्णयास्तव.**

**निर्णय क्र.६८६ तहकुब. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९** **श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी व समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.६८७ तहकुब.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३०** **श्री. शरद कचरु गोडगे, मदतनीस, बांधकाम विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.६८८ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१** **श्री.शेखर विजय कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.६८९ तहकुब.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३२** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम-२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू केलेबाबत.**

**निर्णय क्र.६९० तहकुब.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३** **शिर्डी महोत्सवात सांस्कृतीक कार्यक्रम निश्चित करणे व कलाकार मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.६९१ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **सन-२०२३ चे सहा साईलीला अंक (मराठी व हिंदी-इंग्रजी प्रत्येकी) तसेच अंक वितरणकामी पाकीटे छपाई करुन पुरवठा होणेसाठी ई-निविदा मागविणे तसेच इतर अनुषंगीक बाबींसाठी येणारा अंदाजे खर्च विभागाचे अंदाजपत्रकीय तरतूदीमधुन करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६९२ तहकुब.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **मा.तदर्थ समितीचे अध्यक्ष, मा.सदस्य व अधिकारी वर्ग यांना श्री साईबाबा दैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका-२०२३ विनामुल्य भेट देणेबाबत.**

**निर्णय क्र.६९३** **तहकुब.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी-२०२२ च्या शिल्लक साठा लॉटने विक्रीकामी प्राप्त झालेल्या दराबाबत.**

**निर्णय क्र.६९४** **तहकुब.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचारी यांना दि.१.११.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीत कर्मचारी राज्य विमा (ESIC) रकमेचा भरणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.६९५** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५** **श्री.राहूल रामचंद्र इंगावले, सेवा निलंबीत मदतनीस, विद्युत विभाग यांचे दि.२०.१०.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.६९६** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६** **श्री साईबाबा हॉस्पिटल मधील नविन सेंट्रल ए.सी. सिस्टीमला विद्युत पुरवठा करणेसाठी इलेकट्रीकल केबल व कंट्रोल पॅनल खरेदी करुन बसविणेचे काम करुन घेणेकामी येणा-या रक्कम रु.१०,२७,७८१/-मात्रचे खर्चास तसेच संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६९७** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **श्रींचे समाधी मंदिर व मंदिर परिसरात स्थायी अग्नीशमन यंत्रणेचे फायर पंपकरीता सप्लाय देणेकामी ३०० स्के.एम.एम. केबल, ग्लॅण्ड, लग्ज, केबल ट्रे, अर्थिंग मटेरीअल खरेदी करणेस व सदरचे काम ठेकेदाराकडून करुन घेणेस येणा-या रक्कम रु.१४,६९,९३५/- मात्रचे खर्चास तसेच संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६९८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८** **संस्थान निधीतून नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयात भूसंदर्भ क्र.३८/२०१२ दाखल केला होता, त्याचा निकाल दि.२९/०१/२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाच्या आधारे कलम २८अ खाली मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांनी केलेल्या निकालाच्या आधारे श्री.कारभारी पांडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई रक्कम अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.६९९** **तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.९** **संस्थान मालकीच्या जागेत चालवत असलेल्या व्यवसायांच्या जागा कोविड-१९, लॉकडाऊन-२ कालावधीचे जागा भाडे माफ होणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.श्रीसासंएक्रसो/ २१३/२०२२, दि.२७/०८/२०२२ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.७००** **सदर प्रकरणी कोवीड कालावधीतील शासनाचे धोरण काय आहे याची माहिति घेऊन प्रस्ताव समितीसमोर सादर करावा.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता फर्निचर वर्क, ऑडीटोरिअम फर्निचर, खेळांचे मैदाने विकसीत करणे व अनुषंगीक सिव्हील व इलेकट्रीकलचे कामांच्या अंदाजपत्रकास मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांची मान्यता घेणेकामी सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेचा प्रस्ताव माहितीस्तव सादर.**

**निर्णय क्र.७०१** **तदर्थ समितीचे सदस्य या विषयातील तज्ञ नाहीत. सबब श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम 17(2)(J) नुसार प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपसमितीचा प्रस्ताव सादर करावा.**

**ज्या शैक्षणिक संस्थामध्ये डीजीटल क्लासेस वैगरे सोई आहेत, ज्यांचा प्रस्तावीत प्रकल्पामध्ये उल्लेख केला आहे, अशा महाराष्ट्रातील नामांकित व प्रतिथयश संस्थानां, इंटरनॅशनल स्कुल यांना प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटी देऊन माहिती घ्यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.११** **वाहन विभागाकडील २० प्रवासी बसेसचे वापराबाबत.**

**निर्णय क्र.७०२** **तहकुब.** **(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१२** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Liquid Medical Oxygen Gas Plant (LMO) ला मागील मंजुर दराने मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.७०३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.६०,३७,०७४/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव पुर्न:विचारार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.७०४** **मुख्य लेखाधिकारी यांचेकडून लेखापरिक्षण करुन घ्यावे. लेखापरिक्षण अहवालासह समितीसमोर सदरचा विषय सादर करावा.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगस्ट-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.९३,७७,७२०/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव पुर्न:विचारार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.७०५** **मुख्य लेखाधिकारी यांचेकडून लेखापरिक्षण करुन घ्यावे. लेखापरिक्षण अहवालासह समितीसमोर सदरचा विषय सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१५**

**निर्णय क्र.७०६** **संस्थानने काही वाहनांची यापुर्वी त्रयस्त व्यक्तिंना विक्री केलेली आहे. मात्र अद्यापही ती वाहने संस्थानचे नावेच आहेत, याबाबत आर.टी.ओ. व संबधीत वाहन खरेदीदार यांचेशी पत्रव्यवहार करावा व ती वाहने, आर.टी.ओ. चे दप्तरी वाहन खरेदीदाराचे नांवे होण्यासाठी पाठपुरावा करावा.**

**यापुढे वाहनांची लिलावाने विक्री करतांना ई-निविदेमध्येच अशी अट व शर्थ टाकण्यात यावी की, वाहन खरेदीदाराने संबंधीत वाहन त्याचे नावावर केल्याशिवाय त्यास वाहनाचा ताबा मिळणार नाही व अशा विकलेल्या वाहनांना खरेदीदाराचे नाव लागलेखेरीज त्यास सदरहू वाहनाचा ताबा देण्यात येवू नये.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१६**

**निर्णय क्र.७०७** **सेवा विनिमयानुसार किंवा समितीचे ठरावानुसार एकाच विभागात किंवा एकाच पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-याची बदली झाली किंवा कसे, झाली नसल्यास का करण्यात आलेली नाही याचे खुलाशासह विषय समितीसमोर ठेवण्यात यावे.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/परिचारिकांचा नेमणूक कराराचा कालावधी संपुष्टात येत असलेबाबत.**

**निर्णय क्र.७०८ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/परिचारिका यांची दि.१८/१२/२०२२ रोजी मुदत संपत आहे. पुरेशी व्यवस्था करण्यासाठी अवधी नसल्याने दि.३१ मार्च,२०२३ पर्यंत त्यांचे अर्जानुसार सध्याचे वेतनानुसार मुदतवाढ देण्यात येत आहे. त्या आगोदर पुन्हा प्रक्रिया राबवायची आहे किंवा पुढील एक वर्ष कालावधी वाढवून देता येईल याचा सविस्तर अहवालासह प्रस्ताव समितीपुढे सादर करावा. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१८- पुजारी, उपपुजारी, विनावादक, तबला वादक इत्यादि भरती प्रक्रियेबाबत २.११.२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९५ नुसार माहिती.**

**निर्णय क्र.७०९ प्रस्तावित सेवा प्रवेश नियमावलीमध्ये विहित पात्रता उदा.वेदपठनाचा ५ वर्षाचा अनुभव याचा उल्लेख नाही. जरी सेवा प्रवेश नियमावली अद्याप शासनाकडून मंजूर होणे बाकी आहे तरीही पुर्वी तदर्थ समितीने घेतलेल्या निर्णयानुसार तो पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रायोगीक तत्वावर त्याचे पालन करण्याचा निर्णय झालेला आहे. ठेकेदारामार्फत पुजारी, सहा.पुजारी व तबलावादक यांची सेवा मंदिराचे प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदरहु प्रस्ताव मान्य करता येत नाही. सदर प्रक्रिया रद्द केलेली आहे.**

**प्रस्तावित सेवाप्रवेश प्रक्रिया नियमावलीमध्ये विहित अर्हतेनुसार कंत्राटी पध्दतीने कमीत कमी तीन वर्षाकरीता संस्थानकडून नवीन प्रकिया राबवून नेमणूक करण्यासाठी किंवा अन्य अभिप्राय याचे अहवालासह नविन प्रस्ताव सादर करावा. सदर निर्णय धोरणात्मक असल्याने मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करावा.**

**(कार्यवाही-कामगार विभाग/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१९, निर्णय क्र.७१०- फायर ऑडीट, स्ट्रक्चरल ऑडीट, सेफ्टी ऑडीट, इलेक्ट्रिकल ऑडीट, परफार्मन्स ऑडीट यावर माहिती विचारली. स्ट्रक्चरल ऑडीट झाल्याचे सांगण्यात आले. या सर्व बाबीचा सविस्तर अहवाल समितीसमारे सादर करावा. त्याची पुर्तता करण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा व पुढील दोन महिन्यात पुर्तता करावी. त्याचाही अहवाल समितीसमोर सादर करावा. (कार्यवाही-सर्व विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२०, निर्णय क्र.७११- श्री.साहेबराव लंके, लेखाधिकारी यांचे म्हणणे ऐकुण घेतले. त्यांची विनंती आहे की, तत्कालीन चौकशी अधिकारी श्री.ताकटे यांनी निर्दोष असल्याचा दिलेला अहवाल स्विकारणेत यावा व त्यावरच कार्यवाही करावी. परंतु व्यवस्थापन समितीने यापुर्वीच निर्णय घेतल्यामुळे त्यात बदल करणे योग्य नाही. फक्त सध्याचे चौकशी अधिकारी यांना ९० दिवसाचे आत चौकशी पुर्ण करुन अहवाल देण्याची विनंती करावी. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

**आयत्या वेळेचा विषय नं.२१**

**निर्णय क्र.७१२** श्री साईनाथ रुग्णालयातील आर.एम.ओ. डॉ.बाणेश गायकवाड यांचे म्हणणे ऐकुण घेतले. त्यांनी त्यांचे मुळ पदाचे म्हणजे आर.एम.ओ. पदाचे मुळ काम पुढे चालू ठेवावे असे त्यांना सांगण्यात आले. सदर पदासाठी शासनाकडे लागु असलेल्या आश्वासित प्रगती योजना व पदोन्नती योजना लागु आहे किंवा नाही, हे पाहून लागु असल्यास योग्य अहवाल सादर करावा. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२२**

**निर्णय क्र.७१३** चक्रिय पध्दतीने दि.१४/१२/२०२२ रोजी प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना पाठविलेला अहवाल वाचून कायम करण्यात आला. त्या विषयाचे अनुषंगाने समितीने एकमताने निर्णय घेतला की, तुप खरेदी निविदा प्रक्रियेचे व्यतिरिक्त इतर बाबींचा देखील वस्तुनिष्ठ अहवाल समितीचे अध्यक्ष यांनी मा.उच्च न्यायालय व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठवावा. आवश्यकता वाटल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ चे कलम २७ प्रमाणे राज्य शासनाला सक्षम अधिका-याची नेमणूक करणे, संस्थानचे रेकॉर्डस, अकाऊंटस् वैगरे तपासण्याची शिफारस करावी.

---

**वरील निर्णय क्र.६५९ ते ७१३ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ९.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(राहूल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**